# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६२ ११८८
२५६२ ११५७
२५६२ ११५९

शैक्षणिक संलग्नता कक्ष
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई–मेल:affiliation@pun.unipune.ac.in


**संदर्भ क्र.: सीए/** 48 **दिनांक :** 13/11/2024

प्रति,
मा.अध्यक्ष/सचिव/प्राचार्य/संचालक,
शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

**विषय :— शैक्षणिक वर्ष २०२१—२२ व २०२२—२३ करिता (NCTE - Performance Appraisal Report - PAR) भरण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र मिळणेकामी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणेबाबत..**

संदर्भ :— १. मा.सदस्य सचिव, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली यांची संदर्भ क्र. F.No. NCTE-Reg1012/12/2024-Reg.Sec-HQ Dt. 09 September 2024 रोजीची जाहीर सुचना.
२. प्रस्तुत विभागाचे जा.क्र.सीए/१६, दिनांक ३०/१०/२०२४ रोजीचे पत्र.
३. प्रस्तुत विभागाचे जा.क्र.सीए/२२, दिनांक ०४/११/२०२४ रोजीचे पत्र.
४. मा.अवर सचिव, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली यांची संदर्भ क्र. F.No. NCTE-Reg1012/12/2024-Reg.Sec-HQ Dt. 07/11/2024 रोजीची जाहीर सुचना.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्र. १ च्या पत्रास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२१—२२ व २०२२—२३ चे Performance Appraisal Report (PAR) सर्व संबंधित अध्यापक संस्थांनी राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषेदेस (NCTE) सादर करणे अनिवार्य असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत विभागाने संदर्भ क्र. २ च्या पत्रानुसार सदर प्रमाणपत्र मिळणेकामी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याबाबत सर्व संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे, परंतू ब—याचशा महाविद्यालयांनी सदरचा प्रस्ताव अद्यापही ऑनलाईन पध्दतीने सादर न केल्याचे, ज्या महाविद्यालयांनी माहिती भरलेली आहे ती अर्धवट व व्यवस्थित न भरल्याचे, कागदपत्रे योग्यरितीने अपलोड न केल्याचे निदर्शनास येत आहे. भरलेली माहिती सुसंगत नसल्याने ऑनलाईन पध्दतीने प्रमाणपत्र निर्गमित करताना अडचणी येत आहे.

याबाबत ज्यांनी यापूर्वी माहिती भरलेली आहे व ज्यांनी माहिती भरलेली नाही अशा सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर BOD online – College users – Affiliation मध्ये NCTE - Performance Appraisal Report (PAR) साठी प्रस्ताव पुन:श्च भरण्यासाठी लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

लिंकमध्ये विचारणा करण्यात आल्याप्रमाणे योग्य माहिती भरावी व त्यासंबंधित असलेले आवश्यक कागदपत्र upload करावे व preview करून पहावे. सदरची माहिती तपासून/खात्री केल्यानंतरच Final submission करावे.

सबब, सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी मंगळवार दिनांक १९ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या प्रस्तावाची प्रिंट काढून सदर प्रस्तावाची प्रत (Hard Copy) मा.अध्यक्ष/सचिव व प्राचार्य यांचेमार्फत संस्थेच्या/महाविद्यालयाच्या लेटरहेडवर (Covering Letter) मंगळवार दिनांक १९ नोव्हेंबर, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी संलग्नता कक्ष येथे सादर करावी.

कळावे,

आपला

18/11/24

for उपकुलसचिव
शैक्षणिक संलग्नता कक्ष